**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २३/२०२२** **निशाणी ४५ पुढे**

सुधा निरगुडे वि. कोंडाजी निरगुडे व इतर.

**उलटतपास वादीतर्फे श्री. ए. पी. गंगावणे अधिवक्ता**

हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुराव्याचे प्रतिज्ञापत्रातील कलम २ ते ५ मधील मजकुर काय आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५४१ ही मिळकत वादी यांची खरेदी मालकीची आहे. वादीच्या हक्कामध्ये दि. ३०.१२.२०१४ व ०३.०१.२०१५ रोजी झालेल्या खरेदीदस्ताबाबत मला माहिती आहे. साक्षीदार सांगतो की, चुकीचे खरेदी दस्त झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचे हक्कात झालेले खरेदीखत रद्द होवून मिळणेकामी दावा दाखल केलेला नव्हता. मला खरेदीदस्त रद्द होण्याचे केलेल्या दाव्याचे नंबर सांगता येणार नाही व कोणत्या कोर्टात दाखल केलेले आहे ते देखील सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५४१ मध्ये वैयक्तिक माझे नाव नाही हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीपैकी १ आर क्षेत्र सुरुवातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी संपादित केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर ३ आर क्षेत्र सडक परिवहन राज मार्ग मंत्रालय यांचेमार्फत अधिग्रहित झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरित क्षेत्र वादी यांच्या मालकीचे आहे. साक्षीदार सांगतो की, केवळ वादी यांचा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचे लाभात झालेल्या खरेदीखताच्या आधारे फेरफार क्र. ११२३२ व ११२३३ अशा नोंदी झाल्या. सदर नोंदी रद्द होण्याबाबत महसुल कार्यालयात तक्रार दिली आहे. मला त्या तक्रारीचा नंबर सांगता येणार नाही. सदर नोंदीबाबत केलेले तक्रारीचे निकाल मी न्यायालयात सादर करीन. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीचे सातबारा सदरी विहिर विद्युत मोटारीची नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५४१ च्या उत्तरेस गट नं. ५४० आहे. साक्षीदार सांगतो की, पूर्वेस आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी खरेदी घेतलेल्या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचा

संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५४१ मध्ये पुर्वीपासून एक विहिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर २०२१ मध्ये वादी यांनी सदर विहिरीच्या खोलीकरणाचे काम सुरु केले होते. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे व सर्व प्रतिवादींचे पूर्वीपासून वैमनस्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व प्रतिवादींनी वाद मिळकतीमध्ये असलेल्या विहिरीमध्ये विषारी औषध टाकण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४.११.२०१८ रोजी वादी यांनी माझे विरोधात पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८. ०६.२००९ रोजी माझे व सुधा निरगुडे यांचे पती दरम्यान ५० रुपयांचे बॉन्ड पेपरवर समजुत पत्र तयार करण्यात आले होते. साक्षीदार सांगतो की, तो स्टॅम्प पेपर वेगळा होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलिस स्टेशनला केलेल्या तक्रारीबाबत ते समजुत पत्र होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी वाद मिळकतीमधील विहिरीचे खोलीकरणाचेवेळी विहिर संपूर्णत: आच्छादित केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही वादी यांना विहिर खोलीकरणाचे काम बंद करण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे व वादीचे शाब्दीक वाद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी वादी यांनी आमच्या विरोधात पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. मी तहसिलदार सिन्नर व तलाठी कार्यालय पांगरी यांना वादी करत असलेल्या विहिर खोलीकरणाचे कामाबाबत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रारी या आमच्या मिळकतीतील असलेल्या घराबाबत व पोल्ट्री फार्मबाबत नुकसान होवू नये म्हणून केलेल्या होत्या. मी माझी मिळकत गट नं. ५४० चा सातबारा उतारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सातबारा सदरी घर व पोल्ट्री फार्मची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी गट नं. ५४० मध्ये घर व पोल्ट्री फार्म अस्तित्वात आहे हे दर्शविणारा माझे तोंडी शब्दा व्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे घराचे भिंतीला तडा गेला होता हे दाखविणारा माझे तोंडी शब्दा व्यतिरिक्त इतर पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व तलाठ्यांचे संबंध चांगले असल्याने तलाठींनी माझे सांगण्यानुसार पंचनामा तयार करुन तहसिलदार यांना पाठविला. हे म्हणणे खरे आहे की, माझे अर्जावरुन वादी यांचेविरोधात कोणतीही कारवाई झाली नाही. अस्तित्वातील

विहिरीपासून किती अंतरावर दुसरी विहिर खोदता येईल याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ५४१ मधील वादी यांची पूर्वीची विहिर व आमच्या मिळकतीतील गट नं. ५४० मधील नव्याने खोदलेली विहिर जवळजवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांनी विहिर खोदण्यासाठी मोठी मशिनरी आणली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी काम बंद पाडल्यामुळे विहिरीवर टाकलेले आच्छादन व मशिनरी वादी यांना काढून घ्यावी लागली. साक्षीदार सांगतो की, विहिरीला आच्छादन नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमधील विहिरीचा व प्रतिवादींचा काहीही संबंध नाही. गट नं. ५४१ बाबत हक्कसोड पत्र करुन दिले होते ह्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीबाबत झालेले खरेदीदस्त क्र. ७२६४/१४ हे कायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, उलट मागणी दावा करण्यास कोणतेही कारण घडले नाही. उलट दावा करण्यास बेकायदेशीर खरेदीखत, विहिरीचे कामापासून जवळच अस्तित्वात असलेले पोल्ट्री फार्म व आमचे राहते घर यांना होणारी नुकसान हे कारण होते. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादी यांना त्रास देण्याच्या हेतूने खोटा जबाब दाखल करुन खोटा उलट दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोट्या मजकूराचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष,

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2025.12.17 16:12:28 +0530

ठिकाण— सिन्नर
दिनांक— १७.१२.२०२५

**(लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सिन्नर.